शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष अकरावे : अंक तिसावा । एप्रिल-मे-जून २०२२

महाराष्ट्र शासन आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार प्राप्त
श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस, कोल्हापूर संचलित

## न्यू कॉलेज, कोल्हापूर

Reaccredited By NAAC Grade 'A+'

# १९९० नंतरची मराठी कादंबरी



शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

**वर्ष अकरावे : अंक तिसावा**

**एप्रिल–मे–जून २०२२**

## १९९० नंतरची मराठी कादंबरी

**● संपादक ●**

नंदकुमार मोरे

**● संपादक मंडळ ●**

एकनाथ पाटील । शामसुंदर मिरजकर । गोमटेश्वर पाटील । मांतेश हिरेमठ

**● अतिथी संपादक ●**

**डॉ. व्ही. एम. पाटील**

प्राचार्य, न्यू कॉलेज, कोल्हापूर

**गुंडोपंत पाटील**

मराठी विभाग प्रमुख, न्यू कॉलेज, कोल्हापूर

**● अतिथी संपादक मंडळ ●**

अरुण शिंदे । दीपककुमार वळवी । सुजय पाटील । गोमटेश्वर पाटील । मांतेश हिरेमठ

**● प्रकाशक ●**

**प्रकाश दुकळे**

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

द्वारा : 'शब्दगंध', प्लॉट नं. ३/ब, नृसिंह कॉलनी,

फुलेवाडी रिंगरोड, कोल्हापूर–४१६०१०

**● मुद्रक ●**

भारती मुद्रणालय

८३२, ई वॉर्ड, शाहूपुरी ४थी गल्ली, कोल्हापूर. फोन नं.: ०२३१–२६५४३२९

**मूल्य : ३००/–**

ही संशोधन पत्रिका प्रकाशक डॉ. प्रकाश दुकळे, यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यासाठी भारती मुद्रणालय, कोल्हापूर येथे छापून 'शब्दगंध', प्लॉट नं. ३/ब, नृसिंह कॉलनी, फुलेवाडी रिंगरोड, कोल्हापूर–४१६०१० येथे प्रकाशित केली. या पत्रिकेत प्रकट झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

# अंतरंग


| | | |
|---|---|---|
| | संपादकीय | ........................................ २ |
| १. | नव्वदोत्तरी मराठी आदिवासी कादंबरीतील भिल्ल जमातीचे संस्कृती चित्रण | प्रा. डॉ. कांचन नलवडे ............. ७ |
| २. | १९९० नंतरच्या कादंबरीतील लैंगिक जाणिवा | डॉ. वैजंयती जाधव-भोसले ...... १२ |
| ३. | १९९० नंतरची मराठी विज्ञान कादंबरी | डॉ. गीता गवस-येर्लेकर .......... १८ |
| ४. | आंबेडकरी विचार असणारी १९९० नंतरची मराठी कादंबरी | डॉ. विनोद कांबळे ............... २३ |
| ५. | १९९० नंतरच्या मराठी कादंबरीचे बदलते स्वरूप | डॉ. अशोक सदाशिव तवर ....... ३० |
| ६. | १९९० नंतरच्या ग्रामीण कादंबरीतील पडझडीचे चित्रण. | प्रा. सौ. प्रेरणा एल. चव्हाण ...... ३९ |
| ७. | १९९० नंतरची दलित कादंबरी | डॉ. प्रताप गायकवाड ............. ४३ |
| ८. | जागतिकीकरण आणि १९९० नंतरची मराठी ग्रामीण कादंबरी | प्रा. मृदुला जयंत वाघमारे ........ ४८ |
| ९. | १९९० नंतरच्या मराठी कादंबरीतील नैतिकता | डॉ. प्रकाश आप्पासो हुलेनवर .... ५३ |
| १०. | आदिवासी कादंबरीतील व्यवसाय आणि भाषा | प्रा. डॉ. पांडुरंग ऐवळे ............ ५८ |
| ११. | जागतिकीकरण आणि १९९० नंतरची मराठी कादंबरी | प्रा. डॉ. नामदेव कृष्णा मोळे ..... ६३ |
| १२. | १९९० नंतरच्या ग्रामीण कादंबरीतील स्त्रीचित्रण | प्रियांका अशोक कुंभार ........... ६८ |
| १३. | '१९९० नंतरच्या कादंबरीचा आकृतीबंध' | प्रा. वैशाली श्रीकांत गुंजेकर ...... ७१ |
| १४. | नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरीतील शोषणव्यवस्थेचे चित्रण | श्री. रघुनाथ आण्णा मुडळे ........ ७८ |
| १५. | जागतिकीकरण आणि १९९० नंतरची मराठी कादंबरी | श्री. अशोक जनार्दन पाटील ...... ८२ |
| १६. | नव्वदोत्तरी कादंबरीतील माध्यमांतर | डॉ. अजित यल्लाप्पा कांबळे....... ८६ |
| १७. | १९९० नंतरच्या मराठी आत्मकथनात्मक कादंबरीतील नांगरे पाटलांची विजिगीषू वृत्ती | प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात .. ९१ |
| १८. | १९९० नंतरची मराठी कादंबरी आणि चित्रपट | डॉ. हेमंत नामदेव कुंभार .......... ९७ |
| १९. | १९९० नंतरची मराठीतील स्त्री लिखित - कादंबरी | प्रा. डॉ. स्वाती दीपक दामोदरे ... १०२ |
| २०. | 'नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरीतील स्त्री जाणिवा' | प्रा. संगीता नामदेव खरात ....... १०८ |
| २१. | १९९० नंतरच्या मराठी कादंबरीतून येणारे धनगर समाजातील 'स्त्री'चित्रण | डॉ. संदीप भ. वाकडे ........... १११ |
| २२. | नव्वदोत्तरी मराठी कादंबरी आणि चित्रपट माध्यमांतर | प्रा. डॉ. सागर अशोक लटके .... ११७ |
| २३. | जागतिकीकरणानंतरची कृषी जीवनाचा वेध घेणारी कादंबरी | प्रा. मोहन बाबुराव चव्हाण ...... १२६ |
| २४. | १९९० नंतरची महानगरीय कादंबरी | प्रा. डॉ. सुकुमार दादू आवळे .... १३१ |
| २५. | धूळपावलं - राजकारणाने विदिर्ण समाजाचे चित्रण | प्रा. डॉ. विठ्ठल नामदेव रोटे...... १३७ |
| २६. | नव्वदोत्तर कादंबरीतील ग्रामसंवेदना | प्रा. सुहास व्यंकटेश कुलकर्णी ... १४१ |
| २७. | तसलिमा नासरीन यांच्या 'लज्जा' कादंबरीतील सामाजिक प्रश्न | प्रोफेसर डॉ.सुभाष वाघमारे....... १४६ |
| २८. | महेंद्र कदम यांच्या तणस कादंबरीची स्त्रीवादी मीमांसा | प्रा. डॉ. सुवर्णा नामदेव पाटील ..१५२ |
| २९. | नव्वदनंतरच्या स्त्री-लिखित मराठी कादंबरीतील नवे भान | सुस्मिता आनंदा खुटाळे.......... १५६ |
| ३०. | नवदोत्तरी ग्रामीण कादंबरीतील ग्रामसंवेदनाच्या पडझडीचे चित्रण | श्रीमती सुरेखा बसाप्पा व्हसमने ..१६२ |
| ३१. | पीक आणि मराठी कादंबरी | डॉ. सुरेश बाळकृष्ण शिंदे........ १६६ |
| ३२. | 'हिंदू' कादंबरीतील कृषी व स्त्रीजीवन चित्रण | डॉ. तातोबा बदामे ............... १७३ |
| ३३. | नव्वदोत्तरी कादंबरीतील आधुनिक विचारांच्या स्त्रीव्यक्तिरेखा | शैला आनंदराव क्षीरसागर ....... १७९ |

| | | |
|---|---|---|
| ३४. 'स्त्री' स्वातंत्र्याची अभिव्यक्ती करणारी सानियांची कादंबरी | डॉ. स्वप्निल बुचडे | १८४ |
| ३५. नव्वदोत्तर कादंबरीतील ग्रामसंवेदनांच्या पडझडीचे प्रतिबिंब | प्रा. संतोषकुमार डफळापूरकर | १८८ |
| ३६. नव्वदोत्तर स्त्रीवादी कादंबरी स्त्री जाणिवा | प्रा. संगिता वामन सूर्यवंशी | १९२ |
| ३७. १९९० नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीवरील जागतिकीकरणाचा प्रभाव | प्रा. रेखा काशिनाथ पसाले | १९६ |
| ३८. ग्रामीण कादंबरीकार : अनुराधा गुरव | प्रा. स्मिता कोंडीबा कालभूषण | २०० |
| ३९. १९९० नंतरच्या स्त्री कादंबरीतील जाणिवा | प्रा. डॉ. जयकुमार चंदनशिवे | २०४ |
| ४०. 'अस्वस्थ नायक' व'श्राद्ध' कादंबरीतील भाषा शैलीचा तौलनिक अभ्यास' | प्रा.सुजाता संजय चोपडे (इनामदार) | २०८ |
| ४१. नव्वदोत्तरी कादंबरीचा आशय आणि स्वरुप | प्रा.डॉ.विजय अर्जुन रेवजे | २१२ |
| ४२. जागतिकीकरण आणि १९९० नंतरची मराठी कादंबरी | प्रा. जयवंत शं. सुतार | २१५ |
| ४३. १९९० नंतरची भटक्या-विमुक्तांची कादंबरी | सौ. विजयालक्ष्मी विजयदेवगोजी | २२१ |
| ४४. एकोणीशे नवोदत्तरी मराठी कादंबरीची दशा आणि दिशा | प्रा. डॉ. बाबासाहेब पिरगोंडा नाईक | २२६ |
| ४५. 'नव्वदोत्तर मराठी कांदबरीतील समाजचित्रण' | डॉ. महावीर विठ्ठल कांबळे | २२८ |
| ४६. १९९० नंतरची महानगरीय कादंबरी | डॉ. मनीषा आझाद नायकवडी | २३३ |
| ४७. जागतिकीकरण आणि १९९० नंतरची मराठी कादंबरी | लिंगप्पा गुळाळे | २३८ |
| ४८. नव्वदोत्तरी आदिवासी कादंबरीतील निसर्ग जाणिवा | प्रा. रघुनाथ चंदर गवळी | २४२ |
| ४९. १९९० नंतरच्या स्त्रीलिखित मराठी कादंबरीमधील स्त्री जाणिवा | डॉ. राजश्री बंडोपंत पोवार | २४७ |
| ५०. नव्वदोत्तरी कालखंड आणि रंगनाथपठारे यांच्या कादंबऱ्यांतील अनुभवविश्व | प्रा. डॉ. प्रदीप पाटील | २५२ |
| ५१. जागतिकीकरण आणि १९९० नंतरची मराठी कांदबरी | प्रा. गणपत हनुमंत निमसे | २५८ |
| ५२. १९९० नंतरचे स्त्रियांचे कादंबरीलेखन | प्रा. डॉ. एकनाथ शामराव पाटील | २६२ |
| ५३. १९९० नंतरच्या मराठी कादंबरीतील बेकारीचे चित्रण | अमोल सुभाष कवडे | २६७ |
| ५४. नव्वदोत्तर मराठी कादंबरी : ग्राम आणि आदिवासी जीवन | अमोल चांदेकर | २७१ |
| ५५. १९९० नंतरच्या मराठी व हिंदी कादंबऱ्यांचा तौलनिक अभ्यास | डॉ. भरत भीमराव जाधव | २७६ |
| ५६. 'नव्वदोत्तर आदिवासी कादंबरीतील स्त्रीजीवन' | डॉ. भीमराव खं. वानोळे | २८२ |
| ५७. १९९० नंतरची दलित कादंबरी | डॉ.चंद्रकांत शंकर कांबळे | २८७ |
| ५८. '१९९० नंतरची आदिवासी कादंबरीकारांची मराठी कादंबरी' | प्रा. दत्तू मेंगाळ | २९२ |
| ५९. १९९० नंतरची मराठी कादंबरी-विविधतापूर्ण विपुल प्रवाहित्व | डॉ. युवराज देवाळे | २९९ |
| ६०. जागतिकीकरणानंतरची कृषी जीवनाचा वेध घेणारी कादंबरी | प्रा. मोहन चव्हाण | ३०३ |
| ६१. १९९० नंतरच्या कादंबऱ्यांचे वाङ्मयीन आणि भाषिक विशेष | डॉ. प्रकाश दुकळे | ३०९ |
| ६२. हिंदी उपन्यास साहित्य में प्रतिबिंबित बदलते मूल्य | प्रा.डॉ.सौ.एस.के.पाटील | ३१४ |
| ६३. Post-1990 Marathi Novel and the Language Change | Prof.Kirti Suhas Kurane | ३१८ |
| ६४. Reflection of 'Educational Qualification' in Post 1990's Novels | Prof. Anita Powar | ३२१ |
| ६५. Contribution of Women Novelists In writing Marathi Novels After 1990s | Mrs. Daya Prasad Patil | ३२५ |




ISSN No. 2319-6025

# १९९० नंतरच्या कादंबरीतील लैंगिक जाणिवा

(मेघना पेठे यांच्या नातिचरामि कादंबरीच्या अनुषंगाने)

**डॉ. वैजंयती जाधव-भोसले**
मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे -०५

**उद्देश**

१. १९९० नंतरच्या स्त्रीलिखित कादंबरीतील बदलत्या जाणिवांचा वेध घेणे.
२. १९९० नंतर कादंबरी लेखन करणाऱ्या समकालीन स्त्री लेखिकांचा शोध घेणे.
३. मेघना पेठे यांच्या कादंबरीतील लैंगिक जाणिवांचा शोध घेणे.

**प्रस्तावना**

मराठी साहित्याच्या क्षेत्रात कथा आणि कादंबरी विश्वात स्त्रीलेखिकांनी घातलेली भर अतिशय महत्त्वाची आहे. प्रारंभीच्या काळातील स्त्रियांचे लेखन हे अडखळत, पुरुषांच्या प्रोत्साहनाने तरी कधी त्यांच्या दडपणाखाली झालेले दिसते. तत्कालीन समाज परिस्थितीचे यथायोग्य दर्शन व त्यामध्ये असणारे स्त्रियांचे स्थान यावर हे लेखन प्रकाश टाकते. कथा, कादंबरीतून आलेल्या स्त्रियांच्या चित्रणावर पारंपरिकतेचा पगडा दिसतो. पूर्वीच्या काळात समाजातील रूढीप्रियता, जुन्या चालीरीती त्यामुळे कुटुंबातील स्त्रीला परंपरा शरण अशीच भूमिका निभवावी लागत असे. देवधर्म, कुळाचार, चालीरीती यांच्यातील प्रश्न काढण्याची, शंका काढण्याची किंवा आव्हान देण्याची टाप नव्हती. घरातील वडीलधाऱ्या लोकांनी लहानपणापासूनच संस्काराच्या रूपातून मनावर बिंबवल्या परंपरांचा प्रभाव इतका जबरदस्त असायचा की परंपरेला सोडून एखादी रूढी मोडून आपण वागावे असा विचार सुद्धा या स्त्रियांच्या मनात येत नसे. आनंदीबाई, शांताबाई नाशिककर, लक्ष्मीकन्या, जानकीबाई देसाई या सुरुवातीच्या लेखिकांपासून अगदी वसुंधरा पटवर्धन, यांच्यापर्यंत अनेक लेखिकांच्या कथा, कादंबरीमध्ये अशी रुढीप्रिय परंपरावादी स्थिती दिसून येते. मराठी लेखिकांच्या कथा, कादंबरीतील स्त्री प्रतिमांचे पारंपरिक रूप बदलण्यास त्यांच्या शिक्षण आणि अर्थार्जन या गोष्टी कारणीभूत ठरल्या. आणि याला सुरुवात साधारण १९२० नंतरच्या कालखंडात झालेली दिसते. स्वातंत्र्य चळवळ आणि अर्थार्जन या दोन गोष्टींमुळे स्त्रियांच्या यापूर्वीच्या रोजच्या जीवनात आमूलाग्र बदल घडून आले.१९२० नंतरच्या काळातील विभावरी शिरूरकर, शांताबाई नाशिककर अशा लेखिकांच्या कथा, कादंबऱ्यातून येणारे स्त्री विषयक चित्रण थोडेसे बदलत गेले. या कादंबरीतून येणाऱ्या सुशिक्षित स्त्रिया देखील समाजातील वाईट चालीरितीना परंपरांना विरोध करताना दिसतात, पण संघर्षाची वेळ आल्यावर मात्र जुन्या रूढींना चिकटून राहतात असे दिसते.मालतीबाई दांडेकर यांच्या कादंबऱ्यामधील नायिका स्त्रियांच्या दुःखाचे यथायोग्य चित्रण करतात. त्यांच्या समस्या अधिक प्रभावीपणे मांडतात. पण बंडखोरी करून त्या समस्यांवर उपाययोजना करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात क्वचित दिसते. मराठी स्त्रीलिखित कादंबऱ्यांचा अभ्यास करताना त्यातील स्त्रीजीवनाचा विचार करताना एक गोष्ट लक्षात येते, ती म्हणजे त्यांच्यात सतत जाणवणारा आत्मभानाचा संपूर्ण अभाव. आपण स्वतंत्र व्यक्ती आहोत, व्यक्ती म्हणून आपल्याला स्वतःचे अस्तित्व आणि स्थान असणे आवश्यक आहे. ही भावना आपल्याला तिथे दिसून येत नाही. पुरुषाला स्वतःचे मन, मत, बुद्धी आहे, आचार विचाराचे स्वातंत्र्य आहे तसे आपल्यालाही हवे ही जाणीव प्रकट होताना दिसत नाही.


ISSN No. 2319-6025

१९२० ते १९६० या काळात समाजातील वास्तव, स्त्रियांना ज्या समस्यांना तोंड द्यावे लागते त्या समस्यांचा वेध घेण्याच्या हेतूने लेखन झालेले दिसते.

**विवेचन :**

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पुरुषांबरोबर स्त्रियांनाही मताधिकार असावा यासाठी स्त्रियांच्या झालेल्या चळवळी, नंतर स्त्रियांचे स्वातंत्र्य, शिक्षण, त्यांचे स्वतःचे खास प्रश्न, पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत असून त्यांचा स्त्रीमुक्ती, सामाजिक सांस्कृतिक चळवळीमध्ये सहभाग इत्यादी विचारमंथन सुरू झाले आणि त्यातून विसाव्या शतकातील स्त्रीवादी विचारसरणीचा उदय झाला. दुसऱ्या महायुद्धानंतर या विचारमंथनाला गती मिळालेली. १९८० नंतरच्या कालखंडात स्त्रियांच्या चळवळी, संस्था-संघटना उपक्रम, नियतकालिके, प्रचार साहित्य, विद्यापीठाच्या स्त्री अभ्यास केंद्र प्रमुख प्रसारमाध्यमांनी स्त्री समस्यांना दिलेली जागा, राजकीय सत्तेच्या सहभागासाठी प्रस्तावित केलेली राखीव जागांची तरतूद, शिक्षणक्रमात स्त्रीजीवन दर्शनावर दिलेला भर, स्त्रीशिक्षणाच्या खास सोयी सवलती आणि स्त्रियांच्या कर्तृत्वशाली पूर्वपरंपरा संबंधित विविध पद्धतीने केले जाणारे सामाजिक प्रबोधन यासारख्या अनेक गोष्टींचा प्रभाव या कालखंडातील स्त्री साहित्यावर पडलेला दिसतो. स्त्रीच्या या विकसनशील व्यक्तिगत व सांस्कृतिक प्रतिमानाचे भान आल्यामुळे साहित्यामध्ये स्त्रियांची येणारी प्रतिमा ही वेगळे स्वरूप धारण करते. आधुनिकतेकडे जाणाऱ्या स्त्रिया पारंपरिक नायिकेप्रमाणे आपल्यावर होणारा अन्याय निमूटपणे सहन करत नाहीत. उलट स्वतःवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचे धाडस त्यांच्यात आले आहे. स्वतःच्या शारीरिक आणि मानसिक कोंडमाऱ्याची जाणीव तिला होवू लागली. स्त्री ही देखील पुरुषांप्रमाणेच स्वतंत्र व्यक्ती आहे, आपले वेगळे व्यक्तिमत्त्व आहे त्याचा विकास झाला पाहिजे अशी आत्मभानाची जाणीव या स्त्रियांना झाली. आपले व्यक्तिमत्त्व पुरुषांच्या वर्चस्वाखाली दडपून टाकायला नाही, स्वतःचे वेगळे अस्तित्व, त्यांना स्वतःच्या वेगळ्या ओळखीसह अस्तित्वात हवे ही जाणीव मूळ धरू लागली. मित्र-मैत्रीण या नात्याचे विविध पदर गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतून येताना दिसतात. साठोत्तरी कालखंडात झालेला हा बदल जाणवण्याइतका ठळक आहे. योनिशुचिता या मूल्याचे अवडंबर, शरीर संबंधाबाबत वाटणारा संकोच, त्यातून स्त्रीच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वात येणारे आक्रसलेपण हळूहळू का होईना पण कमी होताना दिसते.[१]

शांता गोखले यांची 'रिटा वेलिणकर', कविता महाजन यांची 'ब्र' या कादंबऱ्यामधून लैंगिक जीवनाविषयीचे अनुभव आशयाची गरज म्हणून येताना दिसतात. या दशकात जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण याचा रेटा वाढला. रंजनपर कादंबऱ्या लिहिणाऱ्या लेखिकांचा झपाटा कमी झाला. अन्याय सहन करणारी,सोशिक,बिचारी अशा प्रकारच्या स्त्री प्रतिमांच्या चित्रणात १९९० नंतर बदल होत गेलेले दिसतात. हे चित्रण काळानुसार बदलत गेले.जीवनव्यवहाराचा कणा असलेल्या लैंगिकतेचा हा विषय धीटपणे कथात्म साहित्यातून येवू लागला. प्रत्यक्ष सांस्कृतिक जीवनात या विषयावर बोलणे वर्ज्य केले जाते पण मेघना पेठे, शांता गोखले, कविता महाजन, गौरी देशपांडे यांच्या साहित्यातून यावर धिटाईने लिहिले, बोलले जाऊ लागले. कादंबऱ्यातील या बदलत्या जाणिवेचा शोध प्रस्तुत शोधनिबंधात घेतला आहे.स्त्री-पुरुष संबंधातील मोकळेपणा, त्यातील शारीर अनुभव कादंबरीत मांडला जाऊ लागला. या शारीर अनुभवाचे त्यातील मोकळेपणाचे चित्रण २००५ मध्ये प्रकाशित झालेल्या मेघना पेठे यांच्या 'नातिचरामिया' कादंबरीत आलेले आहे. याठिकाणी प्रातिनिधिक पद्धतीने मेघना पेठे यांच्या कादंबरीतून स्त्री-पुरुष संबंधांचे आणि त्यातील

ISSN No. 2319-6025

लैंगिक जाणिवेचे चित्रण कशा पद्धतीने येते आहे याचा विचार केला आहे.

मेघना पेठे यांच्या 'नातिचरामि' या कादंबरीमध्ये वेगवेगळ्या परिस्थितीत संघर्ष करणारी,स्वत:चे स्वत्त्व जपणारी नायिका 'मीरा' केंद्रस्थानी आहे. समाजव्यवस्थेतील स्त्री पुरुष नातेसंबंधाची एक चौकट ओलांडणारी स्वत:च्या मताला महत्त्व देणारी मीरा ही प्रमुख व्यक्तिरेखाआहे. विशिष्ट चौकटीच्या पलीकडे जाऊन विचार करणारी नायिका मीरा घटस्फोटानंतर आपले आयुष्य आपल्या पद्धतीने जगत आहे. स्वत:च्या इच्छा-आकांक्षाना महत्त्व देणारी स्वत:ला काय योग्य वाटते काय अयोग्य वाटत हे ठरवणारी नायिका महानगरीय वातावरणात वावरते आहे.समाजव्यवस्थेतील स्त्री-पुरुष नाते संबंधाच्या ठरावीक चौकटींना झुगारून देत मीरा ही व्यक्तिरेखा पुरुषी सामर्थ्याला नाकारते.असे करत असताना विशिष्ट चौकटीतले नियम, नीतिमूल्ये परंपरेने समाजात आलेले नीतिसंकेत याना ती धुडकारून लावते. समाज संस्थेचे नियम, संकेत नायिकेला मान्य नाहीत. नैतिक-अनैतिकतेच्या परंपरागत संकल्पनांना ती छेद देते. स्वत:च्या लैंगिक इच्छांचा ती सन्मान करते. लैंगिकतेच्या परंपरागत नियमांना ती छेद देते आणि स्वत:च्या वेगळ्या अशा संकल्पना ती मांडते. स्त्रियांवरील परंपरेचे ओझे ती वागवत नाही. नैतिक-अनैतिकतेच्या संकल्पना ती फोल ठरवते. समाजव्यवस्थेच्या प्रत्येक टप्प्यावर असलेली बंधनाची मालिका नायिका उखडून टाकते. तिचा दृष्टिकोन हा धाडसी आहे. स्वत:च्या जगण्याविषयीच्या तिच्या संकल्पना तिचे मत स्पष्ट आहे.महानगरीय वातावरणात स्वावलंबी असलेल्या, स्वत:चा निर्णय स्वत: घेणाऱ्या स्त्रियांचे मीरा ही प्रातिनिधिक उदाहरण आहे. 'एखाद्याला एखादी व्यक्ती एका विशिष्ट भूमिकेत नाही पटत अथवा मानवत अथवा भावत, तर राहिलं. यात दोष अथवा न्यून कोणाचंच मानण्याचं कारण नाही. सगळ्यांना आपले रक्ताचे नातेवाईक कुठे पटतात किंवा आवडतात? मग जिथं निवडीची मुभा आहे तिथ तर ते ठरवण्याचा प्रत्येकाला अधिकार असायला हवा आणि तो राबवण्याची मुभाही हवी.' असे परखड विचार ती मांडते. लग्न संस्थेमध्ये समाविष्ट असलेल्या सगळ्याच गोष्टी तिला मान्य नाहीत.ती नवऱ्यापासून घटस्फोट घेते, तिच्या स्वत:च्या विश्वात ती या सगळ्याचा अनुबंध लावू पाहते आहे. कादंबरीची सुरुवात तिच्या आत्मनिवेदनातून होते, गावाकडून परतल्यानंतर ती एकटीच आपल्या घरात राहायला सुरुवात करते आणि मग भूतकाळातील काही आठवणी आणि वर्तमानातील धागे यांचे परस्पर अनुबंध जुळतात का हे ती तपासून पाहते. तिच्या मनाला न पटणाऱ्या किंबहुना त्या साच्यात न बसणाऱ्या गोष्टींना ती झुगारून देते आहे. स्वत: अतिशय प्रगल्भ आणि बुद्धिवंत विचाराची नायिका आपल्या बुद्धीला पटणाऱ्या विचारांना अधिक महत्त्व देते. कादंबरीत ठिकठिकाणी गुंतागुंतीची परिस्थिती निर्माण होते आणि या परिस्थितीत माणूस कसा वागतो, नायिका कसे निर्णय घेते हे बघणे अतिशय महत्त्वाचे आहे. किंबहुना अशा परिस्थितीत माणूस कसा वागतो हेच जणु काही लेखिका पाहत आहे. सामाजिक संकेतांचे बांध तोडून जगणाऱ्या स्त्रियांचे भावविश्व लेखिका या कादंबरीतून उलगडते आहे. अभिव्यक्तीचे अलिखित संकेत ती मोडते. हीच लेखिकेच्या त्यांच्या लेखनाची ताकद ठरली आहे. अमुक अमुक बंधन पाळली म्हणजे निष्ठा,पण तरीही माणस त्या त्या परिस्थितीच्या मर्यादेत आपला म्हणून काही एक संकेत तयार करतातच आणि तिथ निष्ठा वैगेरे पणाला लावतात. चुंबन जेव्हा ती एखाद्या बेसावध क्षणी कोणाला घेऊ देईल, तेव्हा कुठल्याही पुराव्याशिवायही तिच्या त्याच्यातल काही ध्वस्त होईल. अशा स्वरूपाचे भाष्य निष्ठा आणि संकेत यांच्याविषयी लेखिका करते. १९९० नंतरच्या कादंबरीतून लैंगिकतेचे जे उल्लेख येतात ते अतिशय स्पष्टपणे आणि कोणत्याही गुंतागुंतीशिवाय येतात. कादंबरीतील नायिका येथील व्यवस्थेसंदर्भात काही प्रश्न उभे करते, तेवढच


ISSN No. 2319-6025

असत का रे नात्यात? झोपण? शुचिता वैगेरे कुणी ठरवलं? आणि केव्हापासून? आणि दुसरा प्रश्न किंवा शंका म्हणूयात -की हा शुचितेचा बवाल माजवताना सुरक्षितता तर नसते तुमच्या मनात? Glorify sanctity for the sake of security बायकांच्या मनात येत ,झोपलो याच्याबरोबर आणि झालो गरोदर तर ? तरीही हरकत नाही,पण गरोदर राहिल्यावर हा गेला सोडून तर? माझ्या पोराच काय? आणि त्यापेक्षाही, त्याधीही पोर झाल्यावर माझ काय? मला कोण पत्करणार? अगदी स्पष्टच बोलायचं तर सवत्स धेनू पत्करणं! आणि मला पत्करलं नाहीच कोणीच तर, माझं काय होणार? पण पुरुषांच्याही मनात येतच होत की त्याआधी ...खूप आधी..की हिच्या पिशवीत च्यायला कुणाचंही रेट रुजू शकत! माझंच पोर हिच्या पिशवीत असायचं असेल तर हिला अडकवायला हवी. सत्ता संपत्तीच्या संचयापासून गर्भाशयाच्या ह्या आरक्षणाची सुरुवात झाली. माझ्या संपत्तीचा मालक आणि वारस माझ्याच रक्त मांसाचा मुलगा हवा.

पारंपरिक विचारसरणी मधून निर्माण झालेल्या व्यवस्थेवर लेखिका एक प्रकारे प्रहार करू बघते आहे. त्यातील जाणवणारा फोलपणा, त्यातील सत्ता संपत्तीचे वास्तव लेखिका स्पष्टपणे मांडते.लिंगभावाच्या जाणीवेतून या सगळीकडे ती पाहते आहे .व्यवस्थेमध्ये स्त्रियांवरील बंधने, त्यांचा करून घेतला जाणारा वापर, प्रेमाच्या नावाखाली होणारे लैंगिक शोषण या सगळ्याचा लेखाजोखा अतिशय स्पष्टपणे ती मांडते. तिचा स्वत:चा असा एक वेगळा दृष्टीकोन आहे.महानगरात स्वतंत्रपणे राहणारी स्त्री आणि तिची विचारसरणी प्रत्येक गोष्टीचा स्वत:च्या पद्धतीने अर्थ लावायचा तिचा स्वभाव याठिकाणी जागोजागी प्रत्ययाला येतो.जगातील पवित्र्याच्या संकल्पना, योनीशुचिता, शिश्न शुचिता याबद्दल अतिशय मोकळेपणाने ती भाष्य करत आहे. याबद्दल तिच्या स्वत:च्या संकल्पना मांडताना ती म्हणते,

आपल्या पावलांनी शोधलेल्या वाटेवर चालताना आपल्या वाट्याला जे जे भोग आणि उपभोग आले,ते सोसताना आणि भोगताना आपण ठरवूयात काय चूक आणि काय बरोबर वगैरे वगैरे! तसं होताना आपल्याला उलगडत जाईल,की आपल्यासकट सगळंच बदलत आहे... कायमचं वैगेरे काय आहे इथ? विशिष्ट कल्पना किंवा मत हे त्या त्या व्यक्तीच्या वैचारिकतेचा भाग असतो आणि प्रत्येकाने त्याचा स्वीकार करायला पाहिजे असे नाही असे नायिका म्हणते. सर्वसामान्य माणसाच्या मनात असणाऱ्या पती-पत्नीचे नाते आणि त्यांचा जीवन व्यवहार याविषयीचे पारंपरिक विचार मेघना पेठे यांच्या कादंबरीतून नाकारले जातात. शहरी मध्यमवर्गीय घरातील स्त्री तिचे कुटुंब व्यवस्थेविषयीचे आकलन, एक व्यक्ती म्हणून स्वत:कडे बघण्याचा दृष्टिकोन यामुळे कादंबरीतील नायिका, तिचे निर्णय हे पुढारलेले वाटतात. नोकरी अर्थार्जनाने स्त्रियांना आलेला आत्मविश्वास, स्वतंत्रपणे स्वत:चे निर्णय घेण्याची वृत्ती कादंबरीतील नायिकेच्या ठिकाणी दिसते. कधी कधी नायिका अतिशय प्रतिकूल परिस्थितीला मोडीत काढत आहेत. प्रेम ही नाहीतरी झगडून मिळवायची गोष्ट नसते (पृ.२८२.) असे नायिकेला वाटत आहे. आपल्या आयुष्यातील अभाव नायकाला कळू नयेत,त्याच्या सहानुभूतीचा आधार तिला नको आहे. कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीत आपण शरण जायचे नाही असा तिने निग्रह केला आहे. माझा नवरा माझ्या या आंतरिक बदलाबद्दल बेखबर होता, तसाच राहिला.लग्नाकडून अपेक्षा मावळत गेल्या. ही लढाई एकट्याने लढायची असते हे मला आकळत गेलं .आपण मात्र अधिकच जवळ येत गेलो (पृ .३१०). नवऱ्याशी असललेल्या नात्याचे धागे कच्चे होत गेल्याचे नायिकेच्या; लक्षात येते. नवीन घरात गेल्यानंतर ती त्याला तिथं न येण्याबद्दल सुचवते आणि आपण एकटे आहोत हे मनाशी पक्के करते. नवरा न येण्याचा चोइस

ISSN No. 2319-6025

देवून सुद्धा तिथे राहतो. नायिकेचे दुसऱ्या विवाहित पुरुषासोबत असलेल्या संबंधाबाबत तो फार भाष्य करत नाही. त्याला नायिकेकडून या गोष्टी वदवून घेण्याची हिम्मत नाही असा ती निष्कर्ष काढते. नायिकेचे ज्या विवाहित पुरुषासोबत संबंध असतात तो मात्र आपल्या घरात याविषयी कोणतेच भाष्य करत नाही उलट, आपण दोघ जर एकत्र राहणार नाही, तर घरी हे स्पष्ट सांगून, मग त्या दुखावलेल्या माणसांच्यात राहण्याचं काय प्रयोजन आहे? (पृ .३११ ) असा पवित्रा घेतो. यावर नायिका म्हणते, संदिग्धतेची सावली माणसाला कितीतरी हवी वाटते! हे तुला चांगल ठावूक होत, पण एक दिवस मी मात्र माझ्या नवऱ्याला त्या सावलीतून बाहेर काढल. मी काढल हा दावा खोटा आहे. जीवनात न्याय केला. आणि त्याला अचानक त्या सावलीतून बाहेर निघावं लागल, हे खर आहे. १९९० नंतरच्या स्त्रियांच्या कादंबरी लेखनाचा विचार करताना एक लक्षात येते की, 'वर्तमान लेखिका आता प्रयोग करण्याची, लिंगभावातीत लेखन करण्याची आणि स्वतःला निरभ्रपणे अनुसरण्याची मोकळीक सहजपणे घेताना दिसतात .सामाजिक संकेत झुगारण्याची, लिंग विशिष्ट अनुभवांना थेटपणे आणि धीटपणे सामोरे जाण्याची किंवा प्रसंगी भडक भाषा वापरण्याची गरज वाटली तरी तिचा निःसंकोच आदर करतात.[२] १९९० नंतरच्या कादंबरीतील येणाऱ्या नायिका या सांकेतिक स्वरूपाची प्रतिमा मोडताना दिसत आहेत. त्याला त्या छेद देत आहेत. जगणं हे अटळपणे बदलत असत. ते स्थगित नसत. कितीवेळा आपण निर्णय स्वातंत्र्याच्या गरजेबद्दल बोलतो! पण जेवढे वेळा ते हव असत, तेवढेच वेळा निर्णय न घ्यायचं स्वातंत्र्यही हवंच असत की असा विचार नायिका मांडते. एकूणच गुंतागुंतीच्या परिस्थितीत नायिका जे निर्णय घेते, ज्या पद्धतीने विवाह बंधनापासून मुक्त होताना दिसते. त्यातून तिच्या बदलेल्या जाणिवांची अनुभूती जागोजागी येत राहते.

**समारोप :**

१९९० नंतरच्या स्त्रीलिखित कादंबरीत मेघना पेठे यांच्या 'नातिचरामि' या कादंबरीचा विचार याठिकाणी केला आहे. मीरा या नायिकेचे वैवाहिक आयुष्य संपुष्टात आल्यानंतर सुद्धा त्याबद्दल कोणतेही दुःख नायिका व्यक्त करत नाही. लग्नसंस्थेचं फोलपण आतून तिला जाणवणं ही तिच्यातील सामर्थ्याची पहिली खूणच म्हणता येईल. म्हणूनच ती तिच्या विवाहित 'पुरुष' मित्राला 'लग्न नाही केलं आपण तरी एकत्र राहू शकतो' हे ती सुचवू शकते ते याच फोलपणाच्या जाणिवेतून. मात्र तिला लग्नाशिवाय हवे असणारे शारीरिक संबंधही अनैतिक वाटत नाही.

**निष्कर्ष :**

१. लैंगिक प्रेरणा ही मानवाची अस्तित्वाशी निगडित मूलभूत प्रेरणा आहे याचे प्रखर भान वृत्तीगांभीर्याने लेखन करणाऱ्या १९९० नंतरच्या लेखिकांना आहे.
२. लग्न, पुरुष, लैंगिक गरज यांच्या अनुरोधाने स्त्री-पुरुष संबंधांचा विचार या लेखनातून प्रकटतो.
३. स्त्री-पुरुषांच्या नात्याविषयी साशंक असणारी स्त्री या कादंबऱ्यांमधून दिसते, तसेच नवऱ्याचा उल्लेख एकेरी स्वरूपामध्ये येतो, एकेरी नावाने उल्लेख करण्यामध्ये स्त्री पुरुषातील समानता ती बजावू पाहते आहे असे सांगण्याचाही सूर दिसतो.
४. कादंबरीतून येणारे लैंगिक उल्लेख हे अश्लील, बीभत्स किंवा भावना चाळवणारे दिसत नाहीत.
५. भाषेचा मोठा पट, त्यातील विविध बारकाव्यानिशी लेखिकेने मांडला आहे. आत्मनिवेदन तंत्राचा वापर याठिकाणी केला आहे. अनेक विचार, आठवणी यांची सांगड एकत्रितपणे घातली आहे.



६. पुरुष आपल्या शरीर वासनांच्या तृप्तीखातर स्त्रियांकडे आकर्षित होतात, त्यात त्यांचे अलिप्तपण, शरीरकेंद्रीत्व लक्षात येते. तुलनेने स्त्रिया मानसिकदृष्ट्या गुंतताना दिसतात.

(प्रस्तुत शोधनिबंधात प्रातिनिधिक पातळीवर, शब्दमर्यादेचा विचार करता १९९० नंतरच्या कालखंडातील मेघना पेठे यांच्या कादंबरीचा विचार केला आहे.)

**संदर्भ**

१. ढेरे, अरुणा (संपा.) स्त्रीलिखित मराठी कादंबरी, (१९५० ते २०१०) पद्मगंधा प्रकाशन, प्रथमावृत्ती मार्च २०१३ ) पृ.३०
२. ढेरे, अरुणा (संपा.) स्त्रीलिखित मराठी कादंबरी, (१९५० ते २०१०) पद्मगंधा प्रकाशन, प्रथमावृत्ती मार्च २०१३) पृ .८